शुक्रवार दि. १७ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३१६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

जिव्हाळा हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

## राज्यात पावसाची पुन्हा ओढ; धरणांतील पाणीसाठा चिंताजनक, मराठवाडा सर्वाधिक संकटात

### राज्यातील उपयुक्त पाणीसाठा केवळ ४४.५६ टक्क्यांवर; मराठवाड्यात फक्त २५.३९ टक्के, जायकवाडीत ३१.४१ टक्के पाणी शिल्लक

**मुंबई/जालना । प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यात राज्याच्या बहुतांश भागात दमदार हजेरी लावलेल्या पावसाने या आठवड्यात पुन्हा विश्रांती घेतल्याने राज्यातील जलस्थितीबाबत चिंता वाढली आहे. विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये अपेक्षित पाऊस न झाल्याने खरीप हंगाम धोक्यात आला असून पेरणी केलेल्या शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. अनेक जिल्ह्यांत पाण्याची पातळी झपाट्याने घटत असून, अनेक गावांमध्ये अजूनही टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. येत्या काही दिवसांत समाधानकारक पाऊस झाला नाही तर राज्यात पुन्हा पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जलसंपदा विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार राज्यातील मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पांमध्ये सध्या केवळ ४४.५६ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा ६०.५३ टक्के होता. म्हणजेच अवघ्या एका वर्षात राज्याच्या जलसाठ्यात तब्बल १६ टक्क्यांहून अधिक घट झाली आहे.

मराठवाडा सर्वाधिक संकटात राज्यातील सर्व विभागांमध्ये मराठवाड्याची स्थिती सर्वाधिक चिंताजनक आहे. मराठवाड्यातील धरणांमध्ये केवळ २५.३९ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असून, राज्यातील हा सर्वात कमी साठा आहे. पावसाने आणखी ओढ दिल्यास पिण्याच्या पाण्याबरोबरच सिंचनाचाही गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

खरीप पिकांसाठी आवश्यक असलेला पाऊस वेळेवर न झाल्यामुळे सोयाबीन, कापूस, तूर, मका यांसारख्या पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. अनेक ठिकाणी दुबार पेरणीचे संकटही ओढवू शकते.

जायकवाडीची पातळीही चिंताजनक मराठवाड्याची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या जायकवाडी धरणात सध्या ३१.४१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.



जलसंपदा विभागाच्या माहितीनुसार धरणात सध्या ६८१.८६ दलघमी पाणी उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षी याच दिवशी जायकवाडी धरणात ७६.३८ टक्के पाणीसाठा होता. त्यामुळे यंदाची परिस्थिती अधिक गंभीर मानली जात आहे. मराठवाड्यातील इतर प्रमुख धरणांची स्थितीही चिंताजनक आहे. माजलगाव धरण (बीड) १६.७३% मांजरा धरण १६.६४% सिद्धेश्वर धरण (हिंगोली) ०% येलदरी धरण ५१.९३% विष्णुपुरी धरण (नांदेड) ३४.९७% सीना-कोळेगाव धरण (धाराशिव) ०% निम्न तेरणा धरण ३०.२८% निम्न दुधना धरण (परभणी) २३.९५% या आकडेवारीवरून मराठवाड्यातील अनेक धरणे अत्यल्प साठ्यावर पोहोचल्याचे स्पष्ट होत आहे.

विभागनिहाय जलसाठ्याचे चित्र राज्यातील इतर विभागांमध्येही पाणीसाठा गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी झाला आहे. कोकण विभाग ६२.०६% पुणे विभाग ५२.७१% (गेल्या वर्षी ७२.१८%) नाशिक विभाग ४१.७२% अमरावती विभाग ४२.२६% नागपूर विभाग ३९.७६% मराठवाडा २५.३९% कोकण विभागात तुलनेने समाधानकारक पाणीसाठा असला तरी उर्वरित विभागांमध्ये परिस्थिती चिंताजनक आहे.

टँकरची संख्या वाढण्याची शक्यता राज्यातील अनेक गावांमध्ये अद्याप टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पावसाने आणखी काही दिवस दडी मारली तर ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. प्रशासनालाही टँकरची संख्या वाढवावी लागू शकते.

शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट एकीकडे पेरणी पूर्ण झाल्यानंतर पिकांना जीवनदायी पावसाची गरज असताना पावसाने विश्रांती घेतली आहे, तर दुसरीकडे धरणांतील घटता पाणीसाठा सिंचनासाठीही अडचणी निर्माण करू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट उभे राहिले आहे. कृषी तज्ज्ञांच्या मते, येत्या काही दिवसांत राज्यात चांगला पाऊस झाला तर खरीप पिकांना मोठा दिलासा मिळू शकतो; अन्यथा उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

येत्या काही दिवसांतील पाऊस निर्णायक राज्याच्या जलसुरक्षेच्या दृष्टीने आणि खरीप हंगाम वाचविण्यासाठी पुढील काही दिवस अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. समाधानकारक पाऊस झाल्यास धरणांतील पाणीसाठ्यात वाढ होऊन शेतकऱ्यांनाही दिलासा मिळेल. मात्र पावसाने आणखी ओढ दिल्यास मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागांमध्ये पाणीटंचाई, टँकरची वाढती गरज आणि शेतीसमोरील संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

## अश्लील फोटो काढून ब्लॅकमेल करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; रिलस्टार महिलेसह तिघे अटकेत

### घर दाखविण्याच्या बहाण्याने जाळ्यात ओढले; बदनामीची भीती दाखवून ७५ हजारांची खंडणी आणि दोन तोळ्यांच्या तीन सोन्याच्या अंगठ्या उकळल्या, ३.१४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

अश्लील फोटो काढून बदनामीची धमकी देत पैसे आणि सोन्याचे दागिने उकळणाऱ्या ब्लॅकमेलर टोळीचा चंदनझिरा पोलिसांनी पर्दाफाश केला असून, स्वतःला रिलस्टार म्हणून ओळख निर्माण केलेल्या एका महिलेसह दोन तरुणाना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने तिन्ही आरोपींना १७ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून, त्यांच्या ताब्यातून ३ लाख १४ हजार



रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जालना शहरातील नवीन मोंढा परिसरात राहणाऱ्या ४५ वर्षीय व्यक्तीची मुख्य महिला आरोपी शुभांगी हिवाळे हिच्याशी काही दिवसांपूर्वी ओळख झाली होती. या ओळखीचा गैरफायदा घेत तिने संबंधित व्यक्तीला घर दाखविण्याच्या बहाण्याने आपल्या घरी बोलावले. तक्रारदार तेथे पोहोचताच आधीच दबा धरून बसलेल्या तिच्या साथीदारांनी त्याला मारहाण केली. त्यानंतर त्याचे अश्लील फोटो काढून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची तसेच बदनामी करण्याची धमकी देत त्याच्याकडून मोठ्या प्रमाणात खंडणी उकळण्यात आली.

आरोपींनी तक्रारदाराकडून ७५ हजार रुपये रोख, अंदाजे दोन तोळे वजनाच्या तीन सोन्याच्या अंगठ्या जबरदस्तीने घेतल्या. एवढ्यावरच न थांबता तक्रारदाराच्या वाहनाचेही नुकसान केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. बदनामीच्या भीतीमुळे तक्रारदाराने सुरुवातीला कोणतीही तक्रार दाखल केली नव्हती.

सपना निकाळजे प्रकरणानंतर मिळाले धैर्य

हा प्रकार २ जून २०२६ रोजी घडला होता. मात्र, काही आठवड्यांपूर्वी अशाच स्वरूपाच्या (पान २ वर)

## छत्रपती संभाजीनगर येथे १९ जुलै रोजी भव्य राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा

**जालना - प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर शहरात रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी भव्य दिव्य राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा आयोजित करण्यात आला वेळ दुपारी १.३०ते सायं. ६.३०या वेळेत पार पडणार आहे. सदर मेळाव्याचे आयोजन डोंगरदेव वधू-वर सूचक केंद्र यांच्या वतीने करण्यात आले असून, स्थळ आहे. डॉक्टर मौलाना अबू कलाम संशोधन केंद्र सलीम अली समोर टीव्ही सेंटर छत्रपती संभाजीनगर संस्थेच्या माहितीनुसार, डोंगरदिवे वधू-वर सूचक केंद्राने आजपर्यंत तब्बल १५७७१ विवाह जुळवून दिले असून, हजारो कुटुंबांना संसाराच्या नव्या वाटेवर मार्गदर्शन केले आहे. या यशस्वी परंपरेचा ल । भ



अधिकाधिक युवक-युवती आणि पालकांनी घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल डोंगरदिवे यांनी केले आहे. या राज्यस्तरीय मेळाव्यात विविध जिल्ह्यांतील इच्छुक वधू-वर व त्यांच्या पालकांना प्रत्यक्ष भेट, संवाद आणि माहिती देवाण-घेवाण करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सुव्यवस्थित नोंदणी प्रक्रिया, स्वतंत्र कक्ष व्यवस्था आणि मार्गदर्शन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. इच्छुकांनी वेळेत उपस्थित राहून या राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. संपर्कासाठी कांतीलाल डोंगरदिवे ९८८१९५०७५४ / ८४२११०२४५२ या नंबरवर कॉल करू शकता.

## २१ जुलै रोजी जालना येथे संविधानिक हक्कांसाठी मोर्चा

### समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे जिल्हाध्यक्ष गणेश चांदोडे यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी :** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ रोजी जालना येथे आयोजित करण्यात आलेल्या आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष मोर्चा' मध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन राष्ट्रीय ढोर समाज संघटना, जालना जिल्हा यांच्या वतीने करण्यात आले आहे. संघटनेचे जिल्हाध्यक्ष गणेश चांदोडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून सकाळी प्रारंभ होऊन जिल्हाधिकारी



कार्यालय येथे धडकणार आहे. आरक्षण उपवर्गीकरणाच्या (पान २ वर)







शनी मंदिर चौक येथे एक ते दीड तास ट्रॅफिक जाम व मम्मा देवीचे रेल्वे स्टेशन रोडवरील साईडला केलेल्या खड्ड्यांना सिमेंट टाकून बुजवण्याचे काम सुरू असल्यामुळे रोडवर टॉपिक जाम झाल्याचे दिसून येत आहे. *छायाचित्र किरण खानापुरे*

### दीड महिन्यातील संघटनात्मक कामांचा प्रदेशाध्यक्षांसमोर लेखाजोखा

## जालना शहर काँग्रेसला अधिक बळकट करण्याचा निर्धार

### डॉ.विशाल धानुरे यांनी सादर केला सविस्तर अहवाल; जनआंदोलने, सामाजिक उपक्रम आणि संघटन विस्तारावर भर

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहर काँग्रेस कमिटीने मागील दीड महिन्यात राबविलेल्या जनआंदोलनांचा, सामाजिक उपक्रमांचा आणि संघटनात्मक कामांचा सविस्तर अहवाल प्रदेश काँग्रेस अध्यक्षांकडे सादर केला. यावेळी जालना शहर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे यांनी शहर काँग्रेस अधिक सक्षम व संघटित करण्याचा निर्धार व्यक्त करत आगामी काळात जनतेच्या प्रश्नांवर अधिक आक्रमकपणे लढा उभारला जाईल, असे सांगितले. डॉ. धानुरे यांनी प्रदेश नेतृत्वासमोर शहर



कार्यकारिणी, ब्लॉक अध्यक्षांची नियुक्ती, संघटन विस्तार आणि बूथस्तरावरील मजबुतीकरणाबाबत सविस्तर चर्चा केली. तसेच नव्या पदाधिकाऱ्यांची यादीही सादर करण्यात आली.

अहवालानुसार, २२ मे रोजी माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. त्यानंतर २६ मे रोजी माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. २७ मे रोजी पेट्रोल दरवाढ आणि नेट परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ आंदोलन करून केंद्र व राज्य सरकारचा निषेध करण्यात आला. ३० मे रोजी जालना महानगरपालिकेच्या निष्क्रिय कारभाराविरोधात आयुक्तांना निवेदन देण्यात आले. तसेच महापौर दालनातील घटनेच्या निषेधार्थ खासदार कल्याण काळे यांच्या सूचनेनुसार संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करण्यात आले. १९ जून रोजी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त अंध (पान २ वर)

## अण्णाभाऊ साठे पुण्यतिथीनिमित्त आनंदगड येथे प्रबोधन सोहळा

### १८ जुलै रोजी अंबादास सगट यांचे मार्गदर्शन; सर्वांना उपस्थित राहावे, ह.भ.प. डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांचे आवाहन

**जालना -प्रतिनिधी**

: लोकशाहीर, साहित्यसम्राट आणि समाजजागृतीचे महानायक अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवार, १८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता श्री क्षेत्र आनंदगड (लहू क्षेत्र) येथे प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध प्रबोधनकार अंबादास सगट हे अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर मार्गदर्शन करणार असून, जालना जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षांचे नेते, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन समाजप्रबोधनाच्या उद्देशाने करण्यात आले असून, सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ह.भ.प. डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांनी केले आहे. अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी करणारे लोकशाहीर होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येत त्यांनी आपल्या लेखणीतून आणि शाहिरीतून कष्टकरी, कामगार, शोषित, वंचित आणि उपेक्षित समाजाचे दुःख जगासमोर मांडले. त्यांच्या साहित्याने समाजातील अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली.

त्यांची फकिरा ही कादंबरी मराठी साहित्यातील मैलाचा दगड मानली जाते. याशिवाय पोवाडे, लावण्या, कथा, कादंबऱ्या आणि लोकनाट्यांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक समतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविला. त्यांच्या साहित्याचा अनेक भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये



अनुवाद झाला असून, आजही त्यांचे विचार समाजाला दिशा देणारे मानले जातात.

आनंदगड येथे होणाऱ्या या प्रबोधन कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा, सामाजिक (पान २ वर)

## संपादकीय....

### गोंधळात हरवले शहराचे प्रश्न... जबाबदारी कोणाची?

जालना महानगरपालिकेची नुकतीच पार पडलेली सर्वसाधारण सभा अनेक कारणांनी गाजली. भीम पार्क–विपश्यना केंद्राच्या मुद्द्यावरून झालेला गोंधळ, माईक फेकण्याची घटना, सभेचे दहा मिनिटांसाठी तहकूब होणे आणि सत्ताधारी–विरोधकांतील आरोप–प्रत्यारोप यामुळे या सभेची सर्वाधिक चर्चा झाली. मात्र या सर्व गदारोळात एक महत्त्वाचा प्रश्न मागे पडला तो म्हणजे जालना शहरातील मूलभूत समस्यांचा. सभागृहात स्वच्छता, पाणीपुरवठा, अतिक्रमण, पीआर कार्ड, मोकाट जनावरे, ड्रेनेज, सार्वजनिक स्वच्छतागृहे, महिला सुविधा, बीओटी प्रकल्प, गळती, जीएसटी अनुदान, कायदेशीर प्रकरणे अशा अनेक विषयांवर चर्चा झाली. याचा अर्थ शहरातील समस्या कमी झालेल्या नाहीत; उलट त्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. नगरसेवकांनी या समस्या मांडल्या, प्रशासनाने आश्वासने दिली; पण यापैकी किती प्रश्न प्रत्यक्षात मार्गी लागणार, हा खरा प्रश्न आहे. सभेत सर्वाधिक चर्चेत राहिला तो भीम पार्क–विपश्यना केंद्राचा विषय. विषयपत्रिकेत समावेश न झाल्यामुळे निर्माण झालेला वाद इतका टोकाला गेला की सभागृहाचे कामकाज थांबवावे लागले. लोकशाहीत विरोध, आंदोलन आणि तीव्र भूमिका घेण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे; परंतु सभागृहातील शिस्त भंग करून माईक फेकणे किंवा वातावरण तणावपूर्ण करणे, ही लोकप्रतिनिधींकडून अपेक्षित बाब नाही. नागरिकांनी त्यांना विकासासाठी निवडून दिले आहे, संघर्षाचे प्रदर्शन करण्यासाठी नव्हे. सभेतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नगरसेवक जगदीश भरतीया यांनी केलेले वक्तव्य. काही महिला नगरसेवकांऐवजी त्यांचे पती किंवा नातेवाईक प्रत्यक्ष काम पाहतात, असे त्यांनी सभागृहात सांगितले. काही दिवसांपूर्वीच मनपा आयुक्तांनी नगरसेवकांच्या नातेवाईकांच्या हस्तक्षेपावर निर्बंध घालणारे परिपत्रक काढले होते. अशा वेळी हे वक्तव्य केवळ राजकीय नव्हे तर प्रशासकीयदृष्ट्याही गंभीर आहे. जर प्रत्यक्षात निवडून न आलेले लोक महापालिकेच्या कामकाजात हस्तक्षेप करत असतील, तर ते लोकशाही व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांनाच आव्हान ठरते. या विधानाची सत्यता तपासणे आणि आवश्यक असल्यास नियमांची कठोर अंमलबजावणी करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. सभेत नगरसेविका संध्या देठे यांनी मनपा कार्यालयातील कथित शिस्तभंगाचा मुद्दा उपस्थित केला. कार्यालयात गुटखा, तंबाखू, सिगारेट आणि दारू सेवनासारख्या आरोपांवर आयुक्तांनी कठोर भूमिका घेत बंदी आणि निलंबनाची कारवाई करण्याचे आश्वासन दिले. प्रशासनाने या घोषणेची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली, तर त्याचा सकारात्मक संदेश निश्चितच जाईल.दुसरीकडे, श्रीकांत पांगारकर यांनी ड्रेनेज कामातील कथित अनियमिततेवर कोट्यवधींच्या अपहाराचा आरोप केला. अशा आरोपांचे राजकीय भाषण म्हणून विस्मरण न होता, तांत्रिक आणि आर्थिक चौकशी होणे गरजेचे आहे. कारण जनतेच्या पैशातून होणाऱ्या विकासकामांमध्ये पारदर्शकता हा लोकशाहीचा कणा आहे. सभेतील आणखी एक चिंताजनक बाब म्हणजे अनेक विषय ''मंजूर... मंजूर...'' म्हणत मंजूर करण्यात आले. लोकशाही संस्थांमध्ये प्रत्येक विषयावर सखोल चर्चा, मतभेद आणि निर्णय प्रक्रिया अपेक्षित असते. केवळ औपचारिक मंजुरी देणे ही पद्धत दीर्घकालीन दृष्टीने आरोग्यदायी नाही.

जालना शहरासमोर आज पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, ड्रेनेज, अतिक्रमण, आर्थिक नियोजन आणि नागरी सुविधा यांसारखी गंभीर आव्हाने आहेत. या प्रश्नांवर ठोस निर्णय, वेळबद्ध अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा आवश्यक आहे. सभागृहातील वाद, घोषणाबाजी आणि राजकीय आरोप यांपेक्षा नागरिकांना परिणामकारक प्रशासन अधिक महत्त्वाचे आहे. महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा ही केवळ राजकीय व्यासपीठ नसून शहराच्या विकासाचा आराखडा ठरविण्याचे सर्वोच्च लोकशाही व्यासपीठ आहे. त्या व्यासपीठावरून जर गोंधळापेक्षा विकासाची दिशा ठरली, तरच नागरिकांचा लोकशाहीवरील विश्वास अधिक दृढ होईल. अन्यथा प्रत्येक सभा चर्चेत राहील; मात्र शहराचे प्रश्न मात्र कायम प्रलंबितच राहतील.


दैनिक युवा आदर्श दि. १७-०७-२०२६

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
AAMENABI ASRAR AHMAD
To New Name
AAMENA YUSUF SHAIKH
For Passport Issuence
Add- Magal Bajar, Behind Forest Office,
Jalna. 431203.


# जलसंधारण प्रत्येकाचे कर्तव्य!

भारतीय हवामान खात्याने यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस होईल असा अंदाज वर्तवला आहे. यावर्षी पाऊस उशिरा येईल असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता तो खरा ठरला आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही मान्सून वेळेत दाखल झाला पण पुढे मान्सूनचा वेग मंदावला. मान्सूनचा वेग मंदावल्याने जून महिना कोरडाच गेला. जून महिना कोरडा गेल्याने शेतकऱ्यांसह सर्वांची चिंता वाढली. जून महिन्याप्रमाणे जुलै महिना कोरडा जाऊ नये अशी विनवणी शेतकऱ्यांसह सर्व नागरिकांनी वरुण राजाकडे केली. वरुण राजाने ही विनवणी मान्य केली असे म्हणावे लागेल. कारण जुलै महिन्याच्या पहिल्या दिवसापासून राज्यात पावसाने दमदार पुनरागमन केले. आता राज्यात सर्वत्र मान्सून पसरला असून पावसाने राज्यात सर्वदूर हजेरी लावली आहे. विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातील काही भागात दमदार पाऊस कोसळला. राज्यात दमदार पाऊस झाल्याने धरणातील पाणी साठाही वाढत आहे. राज्यातील सर्व नद्या, नाले, तलाव, ओढे ओसंडून वाहत आहेत. वरुण राजाने चांगली कृपा केल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. धरणीमाईही चिंब भिजून हिरवा शालू पांघरत आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात चांगला पाऊस झाला असला तरी आता पावसाने विश्रांती घेतली आहे. राज्यावर अल निनोचे संकट असल्याने पुन्हा असा दमदार पाऊस कधी होईल याचा नेम नाही. जर अल निनोचा प्रभाव कायम राहिला तर पुढे पावसाचे प्रमाण कमीच राहील असा हवामान खात्याचा अंदाज आहे. गेल्या काही वर्षात राज्यात अपुरा पाऊस पडल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली होती. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती. पाण्यासाठी दाही दिशा.... अशी लोकांची अवस्था झाली होती. यावर्षीही पावसाचे प्रमाण कमी राहणार आहे असा अंदाज असल्याने पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. यावर्षी पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन आणि वापर करावा लागणार आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडणार असल्याने पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यावी लागणार आहे. पावसाच्या जास्तीतजास्त पाण्याची बचत कशी होईल याचे नियोजन आतापासूनच करावे लागणार आहे. जमिनीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे बरेचसे पाणी वाया जाते. कमी पाऊस पडणाऱ्या भागात तर हा पाण्याचा अपव्यय होय. महाराष्ट्रात पडणाऱ्या पावसाचा विचार करता आपल्याकडे पाणी जिरवणे आणि पाणी साठवणे या दोन तंत्राची खूप जरुरी आहे. पाणी साठवण्यापेक्षा पाणी जिरवण्याचा फायदा असा की भूगर्भातील पाण्याचे बाष्पीभवन होत नाही व त्यात घट होत नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ धरणे बांधून, पाईपलाईन शहरापर्यंत नेऊन घरोघरी पाणी पोहचवणे असा नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ समाज व पाणी यांच्यातील संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे. त्यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्व पटवून देणे. पावसाचे पाणी वाया जाऊ नये यासाठी पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे याचे शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायला हवे. यासंदर्भात नागरिकांचेही प्रबोधन व्हायला हवे. नदी, विहीर, तलाव, बंधारे यात पावसाचे जास्तीतजास्त पाणी कसे साठेल याचे नियोजन सरकारी पातळीवर व्हायला हवे. नागरिकांनी आपल्या घरात, सोसायटीत रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. शाळा, कॉलेज तसेच सरकारी कार्यालयातही रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. पावसाच्या पाण्याची साठवणूक म्हणजे पर्जन्य जलसंधारण प्रत्येक घरात, सोसायटीत, कार्यालयात झाले पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. पाण्याचा थेंब न थेंब महत्वाचा आहे. कारण पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे कारण ती काळाची गरज आहे. भविष्यात दुष्काळ पडू नये असे वाटत असेल तर पर्जन्य जलसंधारण करावेच लागेल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# जालना महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगी आणि पूर्णत्व प्रमाणपत्रांच्या विलंबावर उच्च न्यायालयाच्या निकालाचा परिणाम

**जालना - प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेकडून बांधकाम परवानग्या पूर्णत्व आणि ताबा प्रमाणपत्र मिळण्यास होणाऱ्या अनाठायी विलंबाने नागरिक आणि विकासक त्रस्त झाले आहेत. प्रशासकीय दिरंगाईमुळे अनेक प्रकल्प रखडले असून, नागरिकांना मोठ्या आर्थिक आणि कायदेशीर त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर, मुंबई उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिलेल्या निकालामुळे महानगरपालिकेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासकीय जबाबदारी निश्चित करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

अनेक प्रकरणांमध्ये, अर्जदारांचे अर्ज कोणत्याही स्पष्ट कारणाशिवाय किंवा ताळमेळ घालून पुन्हा सादर करा यासारख्या अस्पष्ट शेऱ्यांसह प्रलंबित ठेवले जातात. अर्जात नेमक्या कोणत्या त्रुटी आहेत, कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत किंवा कोणत्या कायद्याचे उल्लंघन झाले आहे, याबाबत कोणतीही स्पष्टता दिली जात नाही.

यामुळे नागरिकांना पूर्ण झालेल्या इमारतींचा कायदेशीर ताबा घेणे, त्यांची विक्री करणे किंवा वीज-पाणी यांसारख्या मूलभूत सुविधा मिळवणे अशक्य होते, ज्यामुळे त्यांची मोठी गैरसोय होते.

याच प्रकारच्या एका प्रकरणात, मुंबई उच्च न्यायालयाने आर्केड डेव्हलपर्स लिमिटेड विरुद्ध बृहन्मुंबई महानगरपालिका महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली आहेत. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, वैधानिक प्राधिकरणांनी केवळ कायद्यानुसारच काम करणे बंधनकारक आहे. केवळ तोंडी सूचनांच्या आधारे किंवा अस्पष्ट कारणांसाठी अर्ज अनिश्चित काळासाठी प्रलंबित ठेवता येणार नाहीत, विशेषतः जेव्हा त्याचा परिणाम अनेक सदनिकाधारकांवर होत असेल. जर अर्जात काही त्रुटी असतील, तर त्या अर्जदाराला स्पष्टपणे कळवणे ही महानगरपालिकेची कायदेशीर जबाबदारी आहे. उच्च न्यायालयाने प्रशासकीय पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाच्या तत्त्वांचे पालन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

या कायदेशीर स्थितीवर भाष्य करताना, ॲड. महेश एस. धन्नावत यांनी सांगितले की, ''उच्च न्यायालयाचा हा निकाल केवळ मुंबईपुरता मर्यादित नसून, त्याची कायदेशीर तत्त्वे जालना महानगरपालिकेलाही तंतोतंत लागू होतात. बांधकाम परवानग्या आणि भोगवटा प्रमाणपत्रे वेळेत देणे ही महानगरपालिकेची कायदेशीर जबाबदारी आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम, १९६६ आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ नुसार नागरिकांना विहित मुदतीत सेवा मिळण्याचा हक्क आहे. प्रशासनाने अस्पष्ट शेरे देऊन किंवा तोंडी सूचनांच्या आधारे प्रक्रिया थांबवणे बेकायदेशीर आहे. जालना महानगरपालिकेने या निकालातून बोध घेऊन आपली कार्यपद्धती सुधारावी, नागरिकांचे हित जपावे आणि विकासाला चालना देण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात.''

उच्च न्यायालयाच्या या कठोर भूमिकेमुळे आता जालना महानगरपालिकेवर आपली कार्यपद्धती सुधारण्याचा दबाव वाढला आहे. प्रशासनाने आतातरी पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा देऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विलंबासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही.

**पान १ व ४ वरुन...**

### अश्लील फोटो...

ब्लॅकमेल प्रकरणात सपना निकाळजे आणि तिच्या टोळीला चंदनझिरा पोलिसांनी अटक केल्यानंतर पोलिसांनी नागरिकांना निर्भयपणे पुढे येऊन तक्रार करण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर संबंधित पीडिताने चंदनझिरा पोलीस ठाणे गाठले. पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी तक्रारदाराला कायदेशीर मार्गदर्शन करून धीर दिला. त्यानंतर पीडिताने अधिकृत तक्रार दाखल केली आणि या संपूर्ण ब्लॅकमेल रॅकेटचा उलगडा झाला. तांत्रिक तपासातून आरोपींचा माग काढला

गुन्ह्याची गंभीरता लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी तपासाची सूत्रे हाती घेतली.

पोलीस उपनिरीक्षक नीता दामधर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन आणि गोपनीय माहितीच्या आधारे १४ जुलै रोजी मंठा रोड परिसरातून मुख्य महिला आरोपी शुभांगी हिवाळे हिला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान तिने आपल्या साथीदारांची नावे उघड केली.

त्यानंतर पोलिसांनी राम पाटोळे आणि अनिकेत कसबे यांना अटक केली. आरोपींकडून तक्रारदाराच्या दोन सोन्याच्या अंगठ्या, गुन्ह्यात वापरण्यात आलेले मोबाईल फोन, दोन दुचाकी वाहने, रोख रक्कम असा एकूण ३ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात आणखी काही आरोपी किंवा पीडित आहेत का, याचाही पोलीस तपास सुरू आहे. नागरिकांना पोलिसांचे आवाहन

अशा प्रकारच्या ब्लॅकमेलिंग, हनीट्रॅप किंवा बदनामीच्या धमक्यांना बळी पडू नये आणि कोणत्याही प्रकारची भीती न बाळगता तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन चंदनझिरा पोलिसांनी केले आहे. वेळेवर तक्रार केल्यास अशा टोळ्यांवर प्रभावी कारवाई करणे शक्य होत असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, पोलीस उपनिरीक्षक नीता दामधर, पोलीस हेडकॉन्स्टेबल कृष्णा तंगे, राजू पवार, अभिजीत वायकोस, नवनाथ पाटील, सागर खैरे, महिला पोलीस ज्योती राजपूत तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हेडकॉन्स्टेबल सागर बावस्कर यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

### २१ जुलै रोजी...

निर्णयाविरोधात संविधानिक आणि लोकशाही मार्गाने समाजाची भूमिका शासनापर्यंत पोहोचविणे हा मोर्चाचा प्रमुख उद्देश आहे. मोर्चात जालना जिल्ह्यातील सर्व ढोर समाज बांधव, माता-भगिनी, युवक-युवती तसेच समाजहिताची जाणीव असलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रत्येक गाव, वस्ती आणि परिसरातून जास्तीत जास्त उपस्थिती राहून समाजाची एकजूट दाखवावी, असेही संघटनेने नमूद केले आहे. मोर्चा शांततापूर्ण व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडत संविधानिक मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन करत, सर्वांनी वेळेत उपस्थित राहून संघर्ष मोर्चा यशस्वी करावा, असे आवाहन जिल्हाध्यक्ष गणेश चांदोडे यांनी केले आहे.

### दीड महिन्यातील...

विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. २५ जून रोजी खासदार मुकुल वासनिक यांची संसदीय स्थायी समितीवर निवड झाल्याबद्दल शहरात फटाके फोडून आणि पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. याच कालावधीत टीईटी पेपरफुटी प्रकरणी शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन व निवेदन देण्यात आले. मतदार यादी विशेष पुनरिक्षण (एस. आय. आर.) मोहिमेतही जालना शहर काँग्रेसने सक्रिय सहभाग घेतला. शहरात एस. आय. आर. समितीची स्थापना, खासदार कल्याण काळे यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठका, प्रत्येक बूथवर बी.एल.ए.-२ प्रतिनिधींची नियुक्ती, २९ जून रोजी प्रशिक्षण शिबिर, शहरभर बॅनर व पत्रकांच्या माध्यमातून जनजागृती, तसेच बी.एल.ओ.ना आशा सेविकांची मदत मिळावी ही मागणी प्रशासनाकडे लावून धरली असून ती मान्य झाल्याचा दावा करण्यात आला. याशिवाय १४ जुलै रोजी रघुपती राघव राजाराम सत्याग्रह आंदोलनही करण्यात आले. प्रदेश नेतृत्वासमोर अहवाल सादर करताना डॉ. विशाल धानुरे यांनी जालना शहर काँग्रेस संघटन अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांना एकत्रित घेऊन जनसंपर्क, जनआंदोलने आणि सामाजिक उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना तळागाळापर्यंत सक्षम करण्यावर विशेष भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शहर काँग्रेसने अल्पावधीत केलेल्या आंदोलनात्मक, सामाजिक आणि संघटनात्मक कामांची प्रदेश नेतृत्वाने दखल घेतल्याचे सांगण्यात येत असून, यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

### अण्णाभाऊ साठे...

समता, शिक्षणाचे महत्त्व, संविधानिक मूल्ये आणि समाजातील एकोपा याविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आयोजकांनी जालना शहर व जिल्ह्यातील नागरिक, युवक, विद्यार्थी, महिला तसेच सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला अभिवादन करावे आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले आहे.

### पंडित दीनदयाळ...

आणि रोजगारासोबत उद्योजकतेच्याही दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करा. सक्षम, कौशल्यसंपन्न आणि स्वावलंबी युवा हीच विकसित भारताची खरी ताकद आहे.'' यावेळी त्यांनी युवकांना संदेश दिला. रोजगार मेळाव्यामध्ये विविध शासकीय आस्थापना, उद्योग, कंपन्या, बँका तसेच इन्शुरन्स व फायनान्शिअल संस्थांनी सहभाग नोंदविला. मेळाव्यास ७९७ उमेदवारांनी नोंदणी केली. त्यापैकी ७६५ उमेदवारांनी मुलाखती दिल्या, तर २३४ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता जाधव यांनी केले, तर डॉ. अमोल परिहार यांनी उपस्थितांचे आभार मानले. सदर रोजगार मेळावा यशस्वी करण्यासाठी कौशल्य विकास अधिकारी विशाल येवले तसेच अधिकारी व कर्मचारी अमोल बोरकर, नितीन लोकडे, प्रदीप डोळे, कैलास काळे, रवींद्र पाडमुख, विशाल जगरवाल, दीपक पालवे, गणेश सुपारकर तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील संजय सोनवणे व इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### मधकेंद्र योजनेतून...

जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मराठा पार्क इमारत, दुसरा मजला, विशाल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर चौफुली, जालना-४३१२०३ दुरध्वनी.क्रं. ०२४८२-२२०६२८येथे संपर्क साधावा, मधुक्षेत्रिक अमोल कायंदे ९८३४९४१९५६ तसेच . या ई-मेलवर संपर्क साधण्याचे आवाहन प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### टेंभुर्णी गावाची...

कारभार करण्याची सुरुवात झाली. अशा या गावाच्या कारभारामध्ये अचानक बाह्य शक्तीचा वापर होऊ लागला. आणि बाह्य शक्ती हळूहळू पणे गावातील नेत्यांवर, गावातील नेत्यांच्या कार्यकर्त्यांवर प्रभाव पाडायला सुरुवात झाली. आणि गावातील कारभारी त्या प्रभावाखाली आले आणि स्वतःच्या अस्तित्व विसरून गेले.

चौकट :- गावातील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते जनार्दन सोरे यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, गावातील ग्रामपंचायत मध्ये ग्रामविकास विभागाचा तसेच विविध विभागाचा फंड अस्तित्वात आला तेव्हापासून गावकऱ्यांच्या राजकारणात फरक पडला, त्या फंडाचा व्हिडिओ कसा करायचा याची स्पर्धा नेत्यांमध्ये लागली. दोन ते तीन टर्म पासून ग्रामपंचायत मध्ये स्पर्धा सुरू झाली. खरं पाहिलं तर ग्रामपंचायत मध्ये राजकीय पक्ष अस्तित्वात नसतो. गावातीलच कारभारीन ते निवडून देत असतात. परंतु एका गटाचे जास्त कार्यकर्ते निवडून आल्यानंतर ते दुसऱ्या गटात कसे जातील ही स्पर्धा त्या टेंभुर्णी नगरांमध्ये पाहायला मिळाले. एक गट स्पष्टपणे बहुमत असताना अचानक बदल होऊन दुसऱ्या गटाकडे सत्ता स्पर्धा जाते आणि तिथेच ग्रामपंचायतचा कारभार गावचा कारभार हा वेगळ्या पद्धतीने चालायला सुरुवात झाली आणि गावचा विकास फक्त कागदावरच राहिला. बाह्य शक्तीपासून कारभार करण्याचा जेव्हा फंडा निर्माण झाला तेव्हा मात्र गावातील नेते कार्यकर्ते आणि गावकरी हे स्वतःची ओळख आपण टेंभुर्णीचे आहोत हे विसरायला लागले. आणि ज्यावेळेस चौका चौकात गावावर विविध मंदिरांच्या पारावर ज्यावेळेस हे नेतेमंडळी चर्चा करतात तेव्हा आपल्या पण काय होते हे त्यांच्याकडून करून घ्यावे लागते. असे म्हणू लागले आणि ज्यावेळेस असे म्हणले जाते त्यावेळेस आपली स्वतःची ओळख विसरल्या जाते आपण या गावचे आहोत हेही विसरल्या जातं आणि आपण काय आहोत हे विसरला जातो. हीच अवस्था टेंभुर्णी तल्या प्रत्येकाची झालेली आहे. टेंभुर्णीच्या मतदारांनाही महत्व नाही टेंभुर्णीच्या नागरिकांनाही महत्व नाही टेंभुर्णीच्या नेत्यांनाही महत्व नाही. आम्ही फक्त मोठे आहोत या संकल्पनेत राहिल्यामुळे टेंभुर्णी गावचा विकास खुंटलेला आहे. टेंभुर्णी च्या समस्या म्हणजेच, टेंभुर्णीचे वरचे बस स्टँड ते खालचे बस स्टॅन्ड पर्यंत रस्ता खराब झालेला आहे. टेंभुर्णीच्या गावात बस स्थानक असूनही बस गावात येत नाही. टेंभुर्णीचे बस स्थानक वर नेण्यासाठी टेंभुर्णीच्याच नेत्यांनी प्रयत्न केल्याचे बोलल्या जाते. टेंभुर्णी गावात नाल्यांचा खर्च झालेला आहे. परंतु नाल्यातून पाणीच वाहत नाही. गावातील नळ आल्यानंतर सर्व रस्त्यांवरच पाणी असते. गावची रचना इतकी सुंदर आहे की प्रत्येक गल्ली प्रत्येक रस्ता हा गावच्या बाहेर निघतो. सर्वच रस्त्याचे सिमेंटीकरण झालेले नाही. गावामध्ये स्ट्रीट लाईट आहे त्यावर ग्रामपंचायत कडून दिवाळीला व यात्रेच्या वेळेस लाईट लावल्या जातात. परंतु मागील वर्षी दिवाळीला लाईट लावलेले नाही आणि यात्रेला ही लाईट लावलेले नाही. टेंभुर्णी गावची लाईन कधीही न जाणारी होती परंतु आता कधीही लाईन जाते. कोणताच नेता गावातील त्या लाईन बद्दल बोलत नाही. कारण लाईन चा कॉन्ट्रॅक्ट कोणाला तरी दुसऱ्याला दिलेला आहे त्यामुळे ते चूप आहेत का असा प्रश्न गावकरी विचारत आहे. त्याचा कॉन्टॅक्ट ज्याला दिलेला आहे त्याच्या दबावाखाली आहेत का ते नेते याचाही प्रश्न गावकऱ्यांना पडला आहे. गावच्या अनेक समस्या आहेत त्या समस्या सोडवण्यासाठी गावातील कोणतेही नेते एकत्र येत नाहीत ही दिशादर्शक समस्या आहे. आणि म्हणूनच म्हणावसं वाटतं आता गावातील नेते कार्यकर्ते गावकरी टेंभुर्णीचे आहेत ही ओळख विसरायला लागलेले आहेत.

### एसआयआर मोहिमेला...

कामकाज काटेकोरपणे राबविण्याचे निर्देश दिले.

जाफ्राबाद नगर पंचायत क्षेत्रात एसआयआर प्रक्रिया निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने तयारीला अधिक वेग दिला असून, बैठकीला सर्व संबंधित बीएलओ उपस्थित होते.

# मागील वर्षाचा पीक विमा अद्याप प्रलंबित; यंदा विमा भरण्याकडे शेतकऱ्यांची पाठ

**फुलंब्री । प्रतिनिधी**

मागील वर्षी नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या पिकांसाठी भरलेला पीक विमा अनेक शेतकऱ्यांना अद्याप मिळालेला नसल्याने यंदा पीक विमा भरणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या घटल्याचे चित्र फुलंब्री तालुक्यासह अनेक भागांत दिसून येत आहे.

शासनाने पीक विमा भरण्यासाठी मोहीम सुरू केली असली, तरी मागील वर्षीचे दावे प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. ''मागील वर्षाचा विमाच मिळाला नाही, मग यंदा पुन्हा विमा कशासाठी भरायचा?'' असा सवाल अनेक शेतकरी उपस्थित करत आहेत.

यंदा पेरणीनंतर पीक संरक्षणाच्या दृष्टीने पीक विमा महत्त्वाचा असला, तरी मागील वर्षाच्या अनुभवामुळे अनेक शेतकरी विमा योजनेपासून दूर राहत आहेत. यामुळे विमा अर्जांची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत कमी झाल्याचे सांगितले जात आहे.




शेतकरी संघटना व शेतकऱ्यांनी शासन आणि विमा कंपनीने मागील वर्षीचे सर्व प्रलंबित विमा दावे तातडीने मंजूर करून नुकसानभरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा पीक विमा योजनेवरील शेतकऱ्यांचा विश्वास आणखी कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय

## कर्जमाफीच्या नव्या निकषांमुळे हजारो कुटुंबांना मिळणार नवी संजीवनी

राज्यातील शेती आजही पावसावर अवलंबून आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, तर कधी अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. अशा परिस्थितीत पीक घेण्यासाठी घेतलेले कर्ज वेळेत फेडणे अनेकांना शक्य होत नाही. परिणामी शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतो. याच पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ जाहीर केली आहे. मात्र सुरुवातीला काही निकषांमुळे अनेक पात्र शेतकरी योजनेपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती.

**राज्य शासनाने काय बदल केले?**

राज्य शासनाने आता कर्जमाफीचे निकष अधिक व्यापक केले आहेत. विशेष म्हणजे २०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही नव्या योजनेचा लाभ मिळणार आहे.

**कोणाला मिळणार लाभ?**

नवीन आदेशानुसार खालील शेतकरी पात्र ठरणार आहेत.

महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजना-२०१९ चा लाभ घेतलेले शेतकरी.१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान घेतलेले अल्पमुदत पीककर्ज. पुनर्गठित किंवा रिफायनान्स केलेले पीककर्ज.

३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेले कर्ज.

३१ मार्च २०२६ पर्यंत न फेडलेले कर्ज.सर्व बँकांमधील एकूण थकबाकी दोन लाख रुपयांपर्यंत असलेले शेतकरी.

**किती मिळणार कर्जमाफ?**

योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. ही रक्कम मूळ कर्ज आणि व्याजासह असलेल्या थकबाकीवर लागू होईल. बाबतही दिलासा पूर्वी एकरकमी समझोता () केलेल्या शेतकऱ्यांबाबत काही निर्बंध होते. शासनाने ते हटविल्याने अधिक शेतकरी योजनेच्या कक्षेत येणार आहेत.

**प्रोत्साहनपर लाभाची अट रद्द**

योजनेतील प्रोत्साहनपर लाभासाठी असलेली सन २०२६-२७ ची अटही शासनाने वगळली आहे. त्यामुळे लाभ मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.

**हा निर्णय का महत्त्वाचा?**

राज्यात अनेक शेतकरी २०१९ मध्ये कर्जमाफी घेतल्यानंतरही सलग नैसर्गिक संकटांमुळे पुन्हा कर्जबाजारी झाले. अशा शेतकऱ्यांना नव्या योजनेतून वगळणे अन्यायकारक असल्याची मागणी विविध शेतकरी संघटनांनी केली होती. आता राज्य शासनाने त्यांची दखल घेत निकष बदलले आहेत.

**शेतकऱ्यांवर काय परिणाम होईल?**

या निर्णयामुळे हजारो नव्हे तर लाखो शेतकरी पुन्हा कर्जमाफीसाठी पात्र होणार आहेत. बँकांच्या थकबाकीचा ताण कमी होईल, नवीन पीककर्ज घेण्याचा मार्ग मोकळा होईल आणि शेतीत नव्याने गुंतवणूक करण्याची संधी निर्माण होणार आहेत.

**-जिल्हा माहिती कार्यालय, जालना**

# सुधीर मुनगंटीवार यांना २०२६ चा शिव सन्मान पुरस्कार जाहीर

**रायगड -रवींद्र मालुसरे**

श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती दुर्गराज रायगड यांच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा शिव सन्मान पुरस्कार २०२६'' हा महाराष्ट्राचे माजी सांस्कृतिक मंत्री, ज्येष्ठ लोकनेते आणि शिवभक्त मा. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृह दादर येथे आयोजित विशेष समारंभात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.




छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, शिवराज्याभिषेक सोहळ्याची परंपरा, ऐतिहासिक वारसा आणि शिवकालीन स्मृतींचे जतन-संवर्धन यासाठी भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्वाला हा त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून समितीच्या वतीने देण्यात येतो. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी दुर्गराज रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी चांदीची पालखी अर्पण करून या ऐतिहासिक सोहळ्याच्या वैभवात मोलाची भर घातली. तसेच श्रीक्षेत्र प्रतापगडावरील श्री भवानी मातेला चांदीचे छत्र अर्पण करून त्यांनी शिवभक्ती, श्रद्धा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेप्रती असलेली आपली बांधिलकी अधोरेखित केली आहे.

इतिहास संवर्धनाच्या दृष्टीने त्यांच्या कार्यातील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक वाघनखे, जी अनेक वर्षे लंडनमध्ये जतन करण्यात आली होती, ती महाराष्ट्रात प्रथमच प्रदर्शित होण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्यात त्यांनी बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका. या ऐतिहासिक उपक्रमामुळे लाखो शिवप्रेमींना या ऐतिहासिक ठेव्याचे दर्शन घेण्याची संधी उपलब्ध झाली आणि शिवकालीन इतिहासाबद्दल जनमानसात नव्याने अभिमानाची भावना निर्माण झाली.

याशिवाय, छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक दिन हा इंग्रजी दिनांकानुसार नव्हे, तर हिंदू पंचांगातील ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी या तिथीनुसारच शासनामार्फत अधिकृतरीत्या साजरा करण्यात यावा या ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयासाठी त्यांनी सातत्यपूर्ण, अभ्यासपूर्ण आणि प्रामाणिक पाठपुरावा केला. शिवप्रेमींच्या भावनांचा आदर राखत या विषयात त्यांनी शासनस्तरावर महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

शिवकार्य, इतिहास संवर्धन, सांस्कृतिक वारशाचे जतन, शिवराज्याभिषेक सोहळ्याचे वैभव वृद्धिंगत करणे आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा जागर करण्यासाठी दिलेल्या त्यांच्या उल्लेखनीय योगदानाचा गौरव म्हणून श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती, दुर्गराज रायगड यांच्या वतीने त्यांना शिव सन्मान पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात मान्यवर, इतिहास अभ्यासक, दुर्गप्रेमी, शिवभक्त आणि विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीत संपन्न होणार असून, राज्यभरातील शिवप्रेमींनी या कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष सुनील पवार यांनी केले आहे.

# महाकवि कालिदासांच्या साहित्यकृतीमध्ये भारतीय जीवन पध्दतीचे दर्शन घडते -जयश्री कुलकर्णी

महाकवि कालिदास संस्कृत मधील अद्वितीय कवी असून आपल्या साहित्य कृतीद्वारा मानवी भाव भावनांचे, प्रदेशाचे, भौगोलिक स्थितीचे यथार्थ वर्णन केलेले असल्यामुळे त्यांच्या साहित्यामध्ये भारतीय जीवन पध्दतीचे दर्शन घडते असे प्रतिपादन ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय व श्रीराम संस्कृत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाकवि कालिदास दिनानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून संस्कृत भाषा प्रचार समितीच्या उपाध्यक्षा जयश्री कुलकर्णी यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहूणे म्हणून ब्राह्मण सभेचे अध्यक्ष रमेश देहडकर, सचिव आर.आर. जोशी, सेवानिवृत्त कृषी अधिकारी नंदकुमार पुंड, जालना जिल्हा ग्रंथालय असोसिएशनचे अध्यक्ष डी.बी.देशपांडे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते महाकवि कालिदासांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. ब्राह्मण सभेच्या अध्यक्षपदी रमेश देहडकर व आर.आर.जोशी यांची सचिवपदी निवड झाल्या बद्दल श्रीराम वाचनालय व जालना जिल्हा ग्रंथालय असोसिएशन तर्फे विशेष सत्कार करण्यात आला. पूढे जयश्री कुलकर्णी म्हणाल्या की, महाकवि कालिदासांनी त्यांच्या लेखणीतून साहित्यामध्ये अलंकाराची उधळण केली आहे. महाकवी कालिदास राष्ट्रीय कवी त्यांचे साहित्य राष्ट्रीय प्रतीक आहे. महाकवी जय देवाने त्यांना कविताकामिनी चा विलास या उपाधीने विभूषित केले.नंदकुमार पुंड म्हणाले की, महाकवि कालिदासांचे वाड्:मय म्हणजे मानवी जीवनाला उन्नत करणारे अलोकीक असे साधन आहे. महाकवि कालिदासांचे साहित्यांचे वाचन केल्यास ते विकारापासून विचाराकडे नेणारे आहे.वाचनालयातील वातावरण पाहूण येथे आल्यावर मन प्रसन्न होते. आपले व्यक्तिमत्व अधिक प्रभावी होण्यासाठी ग्रंथालयातील ग्रंथाचे वाचन करावं असं आव्हान याप्रसंगी आर.आर. जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार मिलिंद सावंत यांनी मानले. याप्रसंगी श्रीकांत शेलगावकर,शैलेंद्र बदनापूरकर, पांडुरंग काळे,जगदीश अग्निहोत्री, पद्मीनी कुलकर्णी,डॉ.व्यंकटेश संगेवार, कैलासचंद्र सराफ, रामेश्वर चौडियें, रामकृष्ण खैरे, आशिष उबाळे, सखाराम बोरुळ, सोपान सरनाईक, मनोज खाकीवाले,शेषराम सुसर, सदाशिव चिरके, जवाहर तुल्ले, नंदकुमार सानप, श्रीकांत काळे, प्रणव किनगांवकर, शंकर देवावाले, नितीन बावणे, विजू खिल्लारे, यासह वाचक वर्ग उपस्थित होता.

# विशेष सखोल पुनरावलोकन मोहिमेला दिल्लीच्या धर्तीवर महाराष्ट्रातही मुदतवाढ द्या; शेख अब्दुल रहीम यांचे निवडणूक आयोगाला साकडे!

## कर्मचाऱ्यांना १५,००० रुपये विशेष मानधन व १५ दिवसांची अर्जित रजा मंजूर करण्याची प्रशासनाकडे विनंती

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्यात निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरावलोकन () मोहिमेची व्याप्ती, तांत्रिक अडचणी आणि कर्मचाऱ्यांवरील कामाचा अतिरिक्त ताण लक्षात घेता, दिल्लीच्या धर्तीवर महाराष्ट्रातही या मोहिमेला मुदतवाढ देण्यात यावी, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे राज्य प्रवक्ते आणि हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त (नवी दिल्ली), राज्य निवडणूक आयुक्त (मुंबई) आणि महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांना रीतसर निवेदन पाठवले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने १५ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रानुसार (.२३/२०२६-), तांत्रिक व भौगोलिक अडचणी लक्षात घेऊन दिल्लीसाठी ( ) या मोहिमेचे वेळापत्रक सुधारित करून मुदतवाढ दिली आहे. याच धर्तीवर महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिती आणि मतदारांची मोठी संख्या पाहता, येथेही मुदतवाढ मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**प्रमुख मागण्या आणि महत्त्वाचे मुद्दे:**

दिल्लीच्या धर्तीवर मुदतवाढ द्या: महाराष्ट्राचा भौगोलिक विस्तार मोठा आहे. घरोघरी जाऊन प्रत्यक्ष मतदार पडताळणी करणे, नवीन अर्जांची छाननी करणे आणि संथ सर्व्हरमुळे ऑनलाईन नोंदणी करणे यात प्रचंड वेळ जात आहे. मतदार यादी १००% अचूक व दोषमुक्त करण्यासाठी मुदतवाढ मिळणे अनिवार्य आहे.

विशेष मानधनात वाढ करावी: या मोहिमेत कार्यरत असलेल्या प्रत्येक बूथ लेव्हल ऑफिसरला () सध्या मिळणाऱ्या मानधनात वाढ करून १५,००० रुपये विशेष मानधन मंजूर करण्यात यावे.

१५ दिवसांची अर्जित रजा () मिळावी: शिक्षक व शासकीय कर्मचारी आपल्या नियमित प्रशासकीय व शैक्षणिक जबाबदाऱ्या सांभाळून सुट्ट्यांच्या दिवशीही हे अतिरिक्त काम करत आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या श्रमाची दखल घेऊन त्यांना १५ दिवसांची अर्जित रजा मंजूर करावी.

''लोकशाहीचा पाया असलेली मतदार यादी त्रुटीरहित आणि यशस्वी करण्यासाठी प्रशासन स्तरावरून सकारात्मक निर्णय होणे गरजेचे आहे.

कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा, त्यांच्यावरील ताणाचा आणि कामाच्या गुणवत्तेचा सहानुभूतीपूर्वक विचार करून प्रशासनाने या मागण्या तात्काळ मंजूर कराव्यात.'' शेख अब्दुल रहीम (राज्य प्रवक्ते, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन तथा संस्थापक अध्यक्ष, हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन)

या मोहिमेत प्रामुख्याने शिक्षक व शासकीय कर्मचारी कार्यरत असून, दुहेरी कामाच्या ओझ्यामुळे त्यांच्यावर प्रचंड मानसिक व शारीरिक ताण निर्माण झाला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या १५ जुलैच्या निर्णयाचा आधार घेऊन महाराष्ट्र शासन व राज्य निवडणूक आयोगाने यावर तातडीने न्याय्य निर्णय घ्यावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दैनिक युवा आदर्श दि. १७-०७-२०२६

CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
AMINA BEE YUSUF SHAIKH
To New Name
AAMENA YUSUF SHAIKH
For Passport Issuence
Add- Magal Bajar, Behind Forest Office,
Jalna. 431203.


नियमीत वाचा दैनिक युवा आदर्श

# अर्णव देशपांडे ने केला हिमाचल हम्पता पास

मुंबईतील ट्राया कंपनीत एडिटर म्हणून काम करीत असलेले अर्णव विनोद देशपांडे यांनी हिमाचल प्रदेशातील पीर पंजाल पर्वत रांगेतील प्रसिद्ध हम्पता पास ट्रॅक यशस्वीरित्या पार केला.

युथ हॉस्टेल असोसिएशन ऑफ इंडिया ( ) आयोजित या गिर्यारोहण मोहिमेत देश भरातील ३८ गिर्यारोहक सहभागी झाले होते.त्यात मुंबई महाराष्ट्रातून अर्णव विनोद देशपांडे सिद्धेश म्हात्रे आकाश वाघचौरे, अर्चना वाकचौरे ,तसेच नाशिकचे रत्नाकर शेजवळ ,नागपूरचे प्रणय वाळूंद्रे ,धर्मेंद्र कुमार, या गिरियरोहकांनी यांनी या मोहिमेत सहभाग घेतला .

मनाली जवळील जोब्रा नाला येथून सुरू झालेला हा ट्रॅक पुढे चिका, बालू का घेरा, हम्पता पास, शेया गोसु , छत्रु, असा पूर्ण करण्यात आला सुमारे २७ किलोमीटरचे अंतर आणि १४,०६५ फूट उंच असलेल्या ट्रॅक गिर्यारोहकांनी पाच दिवसात पूर्ण केला माइनस थंडी, पाऊस, जोरदार वारे , पांढरेशुभ्र ढग, खड्काळ जमीन आणि कठीण पर्वतीय चढ उत्तरांचा सामना करत त्यांनी ही मोहीम यशस्वीरित्या पार पाडली हम्ता पास हा हिमाचल प्रदेशातील सर्वात रम्य ट्रेक पैकी एक असून तो हिरव्यागार कुल्लू खोऱ्यातल्या लाहोल स्थितीच्या खडकाळ प्रदेशाशी जोडतो ट्रॅक दरम्यान हिरवीगार झडे पाण्याचे धबधबे रंगीबेरंगी फुले बर्फाच्छादित पर्वत रांगा आणि सुंदर नयनरम्य चंद्रथाल सरोवर पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे.



छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई

हम्पता पास जाण्यासाठी जून ते सप्टेंबर हा कालावधी गिरीरोहन ट्रॅक साठी सर्वोत्तम मानला जातो.

आ अगोदर मुंबईतील अर्णव देशपांडे व सिद्धेश म्हात्रे या दोघांनी बाईकवरून कोकण या शिवाय मराठवाडा नाशिक अशा अनेक ठिकाणी यांनी प्रवास केलेला आहे. असे अनेक उपक्रम ते नेहमीच करीत असतात यातून ते सामाजिक संदेश संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचवीतात

# डिजिटल डागांपासून मुक्ती: हायकोर्टाचा विसरण्याचा अधिकार कायम, सन्मानाने जगण्याचा मार्ग मोकळा

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने विसरण्याचा अधिकार हा नागरिकांच्या मूलभूत हक्काचा अविभाज्य भाग असल्याचे स्पष्ट करत एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या निर्णयामुळे ज्या व्यक्तींवरील गुन्हे रद्द झाले आहेत, त्यांना आता डिजिटल नोंदींमुळे होणाऱ्या त्रासातून मुक्ती मिळून सन्मानाने जगण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके आणि न्यायमूर्ती निवेदिता मेहता यांच्या खंडपीठाने हा ऐतिहासिक निकाल दिला आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, २०१७ मध्ये नागपूर येथील बजाज नगर पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला होता. मात्र, तक्रारदार आणि आरोपी यांच्यात सलोखा झाल्यानंतर, नोव्हेंबर २०१८ मध्ये उच्च न्यायालयाने तो एफआयआर रद्द केला होता. कायदेशीररित्या निर्दोष ठरल्यानंतरही, या प्रकरणाशी संबंधित डिजिटल नोंदी इंटरनेटवर उपलब्ध होत्या. यामुळे याचिकाकर्त्याला नोकरी मिळवण्यात आणि सामाजिक जीवनात अडचणी येत होत्या, ज्यामुळे त्याला मोठ्या सामाजिक अपमानाला सामोरे जावे लागत होते.

याचिकाकर्त्याने आपल्या गोपनीयतेच्या अधिकाराचा भाग म्हणून विसरण्याचा अधिकार लागू करण्याची विनंती न्यायालयाला केली होती. न्यायालयाने हे मान्य केले की, एकदा फौजदारी कारवाई रद्द झाल्यानंतर, त्या व्यक्तीशी संबंधित माहिती इंटरनेटवर जिवंत ठेवण्यात कोणतेही सार्वजनिक हित नाही. न्यायालयाने रजिस्ट्रार जनरलला याचिकाकर्त्याची ओळख ऑनलाइन न्यायालयीन नोंदींमधून मास्क करण्याचे निर्देश दिले.

हा निर्णय गोपनीयतेचा अधिकार हा भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ चा अविभाज्य भाग असल्याचे अधोरेखित करतो, ज्यामध्ये विसरण्याचा अधिकार देखील समाविष्ट आहे. इंटरनेटच्या युगात, एखाद्या व्यक्तीवरील आरोप किंवा खटला रद्द झाल्यानंतरही, त्यासंबंधीची माहिती ऑनलाइन कायम राहते, ज्यामुळे त्यांना आयुष्यभर त्रास सहन करावा लागतो. या निर्णयामुळे अशा व्यक्तींना मोठा दिलासा मिळाला आहे.

प्रसिद्ध वकील ॲड. महेश एस. धन्नावत यांनी या निकालाचे स्वागत करताना म्हटले आहे की, ''हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह असून तो प्रत्येक नागरिकाच्या सन्मानाने जगण्याच्या अधिकाराला बळकटी देतो. ज्या व्यक्तींवरील एफआयआर किंवा तक्रारी रद्द झाल्या आहेत, त्यांना आता डिजिटल नोंदींच्या ओझ्यातून मुक्त होऊन समाजात सन्मानाने जगता येईल. विसरण्याचा अधिकार हा अनुच्छेद २१ अंतर्गत मूलभूत मानवी हक्क आहे आणि त्याचे सार्वत्रिक उपयोजन झाल्यास अनेक निष्पाप व्यक्तींना नवीन सुरुवात करण्याची संधी मिळेल.'' या निर्णयामुळे भविष्यात, ज्या व्यक्तींवरील गुन्हे रद्द झाले आहेत किंवा ज्यांना निर्दोष मुक्त करण्यात आले आहे, त्यांना त्यांच्या डिजिटल नोंदी हटवण्याचा किंवा त्यांची ओळख मास्क करण्याचा अधिकार मिळेल. हे तत्त्व सार्वत्रिकरित्या लागू झाल्यास, अनेक व्यक्तींना त्यांच्या भूतकाळातील कायदेशीर अडचणींमुळे होणाऱ्या सामाजिक आणि व्यावसायिक अडथळ्यांमधून बाहेर पडता येईल, असे तज्ज्ञांचे मत आहे.

# शेतकरी उत्पादक कंपन्यांनी कृषि विभागाच्या विविध योजनेतून आर्थिक प्रगती साधावी - सी ए. नंदकिशोर अग्रवाल

**जालना - प्रतिनिधी**

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा च्या माध्यमातून व नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या माध्यमातून व्यवसाय उभारणी, प्रकल्प अहवाल तयार करण्याची पद्धत तसेच कंपनी ऍक्टनुसार शेतकरी उत्पादक कंपनी () प्रभावीपणे कशी चालवावी याबाबत कृषी विज्ञान केंद्र, खरपुडी येथे मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून आत्माचे प्रकल्प संचालक श्री अमोल आगवण, कृषी विज्ञान केंद्र चे शशिकांत पाटील, उप विभागीय कृषि अधिकारी श्री राम रोडगे, सनदी लेखापाल (सी.ए)नंदकिशोर अग्रवाल , राकेश झगडे प्रकल्प विशेषज्ञ इत्यादी उपस्थित होते सी ए.श्री नंदकिशोर अग्रवाल यांनी शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. त्यांनी व्यवसाय उभारणीसाठी आवश्यक असलेले प्रकल्प अहवाल () कसा तयार करावा, त्यातील आर्थिक नियोजन, बाजारपेठेचा अभ्यास तसेच शेतकरी उत्पादक कंपनीचे व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले.






कृषी पायाभूत सुविधा निधी () योजनेबाबत प्रकल्प संचालक आत्मा जालना श्री अमोल आगवण यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली. या योजनेअंतर्गत उपलब्ध होणारे कर्ज, व्याजात मिळणारी ३ टक्के सूट याबद्दल माहिती दिली आणि कृषी प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी असलेल्या संधींचे त्यांनी सविस्तर विवेचन केले सदरील योजनेत सहभाग घेऊन लाभ घेण्याचे आवाहन केले.

कृषी विज्ञान केंद्राचे विषय तज्ज्ञ श्री शशिकांत पाटील यांनी जालना जिल्ह्यातील कृषी प्रक्रिया उद्योग उभारणीच्या संधींबाबत मार्गदर्शन करताना मूल्यवर्धनाचे महत्त्व, उत्पादन प्रक्रिया आणि बाजारपेठेतील संधी यावर प्रकाश टाकला.

उप विभागीय कृषी अधिकारी श्री राम रोडगे यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ च्या मार्गदर्शक सूचना शेतकऱ्यांना समजावून सांगितल्या. त्यांनी या प्रकल्पातून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या विविध सुविधा व लाभांविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री धैर्यशील पाटील यांनी केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते आणि त्यांनी मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

# छत्रपती संभाजीनगर येथे १९ जुलै रोजी भव्य राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर शहरात रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी भव्य दिव्य राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा आयोजित करण्यात आला वेळ दुपारी १.३०ते सायं. ६.३०या वेळेत पार पडणार आहे. सदर मेळाव्याचे आयोजन डोंगरदेव वधू-वर सूचक केंद्र यांच्या वतीने करण्यात आले असून, स्थळ आहे. डॉक्टर मौलाना अबू कलाम संशोधन केंद्र सलीम अली समोर टीव्ही सेंटर छत्रपती संभाजीनगर संस्थेच्या माहितीनुसार, डोंगरदिवे वधू-वर सूचक केंद्राने आजपर्यंत तब्बल १५७७१ विवाह जुळवून दिले असून, हजारो कुटुंबांना संसाराच्या नव्या वाटेवर मार्गदर्शन केले आहे. या यशस्वी परंपरेचा लाभ अधिकाधिक युवक-युवती आणि पालकांनी घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल डोंगरदिवे यांनी केले आहे. या राज्यस्तरीय मेळाव्यात विविध जिल्ह्यांतील इच्छुक वधू-वर व त्यांच्या पालकांना प्रत्यक्ष भेट, संवाद आणि माहिती देवाण-घेवाण करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सुव्यवस्थित नोंदणी प्रक्रिया, स्वतंत्र कक्ष व्यवस्था आणि मार्गदर्शन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

इच्छुकांनी वेळेत उपस्थित राहून या राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. संपर्कासाठी कांतीलाल डोंगरदिवे ९८८१९५०७५४ / ८४२११०२४५२ या नंबरवर कॉल करू शकता.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याने जागतिक युवा कौशल्य दिन सप्ताहाचा उत्साहात समारोप

**जालना - प्रतिनिधी**

जागतिक युवा कौशल्य दिन सप्ताहानिमित्त आयोजित विविध उपक्रमांचा समारोप दि. १५ जुलै, २०२६ रोजी बॅडमिंटन हॉल, पोलीस परेड ग्राउंड, जालना येथे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना आणि पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पोलिस अधीक्षक, तेघबीरसिंह संधू यांचे मार्गदर्शनाखाली ''पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा'' उत्साहात संपन्न झाला. जागतिक युवा कौशल्य दिन सप्ताहाची सुरुवात दि. ७ जुलै, २०२६ रोजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते रांगोळी स्पर्धेच्या उद्घाटनाने झाली होती. संपूर्ण सप्ताहामध्ये रांगोळी स्पर्धा, मुली व महिलांसाठी स्वसंरक्षण (सेल्फ डिफेन्स) प्रशिक्षण, उद्योजकांचा सन्मान, कौशल्य विकास प्रशिक्षण संस्थांचा सन्मान, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत निवड झालेल्या युवक-युवतींना नियुक्तीपत्रांचे वितरण, नव उद्योजकांचा सन्मान, तसेच जिल्ह्यातील नामांकित महाविद्यालयांसोबत सामंजस्य करार () अशा विविध उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सप्ताहाच्या समारोपानिमित्त आयोजित रोजगार मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी उपआयुक्त, विद्या शितोळे, कौशल्य विकास, छत्रपती संभाजीनगर या होत्या, तर प्रमुख मार्गदर्शक विक्रम साळी, अपर पोलीस अधीक्षक होते. यावेळी प्रमुख अतिथी सहायक आयुक्त, गणेश चिमणकर, कौशल्य विकास, जालना विभागस्तरीय रोजगार मेळावा समन्वय समिती सदस्य अविनाश यशवंत देशपांडे, जिल्हास्तरीय रोजगार मेळावा समन्वय समितीचे अध्यक्ष, अनिल तलरेजा व समिती सदस्य, पंकज कासलीवाल, प्रगणेश केनिया, संजय मिसाळ, मनोहर खाकरे, राजेश भुतिया तसेच, पोलीस निरीक्षक, पंकज उदावंत, राखीव पोलीस निरीक्षक भाऊसाहेब वाघ, पोलीस उपनिरीक्षक, विलास पाटील, तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या विविध उद्योग, कंपन्या, बँका व संस्थांच्या मुलाखत स्टॉलना भेट देऊन उमेदवारांशी संवाद साधला. त्यांनी निवड झालेल्या उमेदवारांचे अभिनंदन करून त्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण केले. तसेच जागतिक युवा कौशल्य दिन सप्ताहादरम्यान आयोजित रांगोळी, निबंध, वक्तृत्व व इतर स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव करून त्यांना सन्मानपत्रांचे वितरण करण्यात आले. ''कौशल्य हीच यशाची खरी ओळख आहे. बदलत्या काळानुसार नवीन कौशल्ये आत्मसात करा, प्रत्येक संधीचे सोने करा (पान २ वर)

## महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रामार्फत जालना येथे

# पशुसंवर्धनावर आधारित शेळीपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, गाय/म्हैसपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र एमसीईडीद्वारे जालना येथे पशुसंवर्धनावर आधारित शेळीपालन कुक्कुटपालन दुग्धव्यवसाय गाय/ म्हैसपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे दि. २० जुलै,२०२६ ते २५ जुलै, २०२६ या कालावधीमध्ये आयोजन करण्यात आले आहे.

सुशिक्षित बेरोजागार युवक-युवती व महिलांनी उद्योग व्यवसाय क्षेत्राकडे वळून स्वतः चा स्वयंरोजगार निर्माण करावा. हा या प्रशिक्षण कार्यक्रम आयोजनामागचा मुख्य उद्देश आहे. या प्रशिक्षणामधून प्रशिक्षणार्थींना स्वयंरोजगाराबाबत उपलब्ध बंदीस्त शेळीपालनः शेळीपालनाची सद्य स्थिती, शेळ्यांच्या विविध जाती निवड, आदर्श गोठा, शेळ्याचे प्रमुख आजार व लक्षणे प्रतिबंधक उपाय व उपचार शेळ्याचे संतुलित आहार, गाभण शेळ्याचे व करड्याचे संगोपन इ. सखोल मार्गदर्शन या शिवाय उद्योजकता प्रशिक्षण ज्यामध्ये उद्योजकीय प्रेरणा व गुणसंपदा, कौशल्य विकास व स्वयं मुल्यांकन (मी कोण आहे) उद्योग उभारणी विविध टप्पे, आपल्या कामासाठी कुठे संपर्क करावा, उद्योग व्यवसायाची निवड, उद्योग संधी, उद्योग व्यवस्थापन, बाजार पेठ व्यवस्थापन, मार्केटिंग व संभाषण कौशल्य, विविध कार्यालय व महामंडळांच्या कर्ज विषयक माहिती, राष्ट्रीय कृत बँका नाबार्ड, यांचे कार्य व योजनांविषयी माहिती लघु उद्योग नोंदणी कर्ज व सादरीकरण व प्रक्रिया, उद्योग संदर्भात कायदे, शासकीय कर्ज योजनांची माहिती व सवलती इत्यादी बाबत तज्ञ व अधिकारी वर्गामार्फत मार्गदर्शन केले जाणार आहे.

कार्यक्रमासाठी प्रशिक्षणार्थी हा किमान ७ वी वर्ग पास व १८ ते ५० वयोगटातील असावा तसेच स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरु करण्याची प्रबळ इच्छा असावी. तरी इच्छुकांनी प्रवेश अर्ज व अधिक माहितीसाठी दि.२० जुलै,२०२६ पूर्वी, कार्यक्रम समन्वयक वैशाली कुलकर्णी, मो.७३५०४१८४९२ संपर्क महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, (एमसीईडी) जिल्हा उद्योग केंद्र द्वारा-मराठा पार्क बिल्डिंग, विशाल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) चौफुली, जालना. फोन.नं.०२४८२-२२०५९२ येथे संपर्क करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी, एमसीईडी विनोद तुपे, यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# मधकेंद्र योजनेतून उत्पन्नाची सुवर्णसंधी मधपेट्या, मधमाशी वसाहत, मधयंत्रांसाठी ५० टक्के अनुदान मधपाळांसाठी १० दिवसांचे प्रशिक्षण

**जालना - प्रतिनिधी**

मधपेट्या, मधमाशी वसाहत, मधयंत्रांसह ५० टक्के अनुदान; १० दिवसांचे देणार प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राबविण्यात येणारी मधकेंद्र (मधमाशा पालन) योजना शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी उत्पन्न वाढविण्याची प्रभावी संधी ठरत आहे. दि. १८ जून २०१९ च्या शासन निर्णयानुसार सुरू असलेल्या या योजनेचा उद्देश मधपाळांचे उत्पन्न वाढवून त्यांचे जीवनमान उंचावणे हा आहे. या योजनेतंर्गत प्रशिक्षण, आवश्यक साहित्य, आर्थिक सहाय्य आणि तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करुन दिले जात असल्याची माहिती जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी दिली.

मधमाशी पालनातून मध व मेण विक्रीद्वारे चांगले उत्पन्न मिळते. तसेच मधमाश्यांच्या परागीभवनामुळे शेती पिकांच्या उत्पादनात्त ३० ते ४० टक्क्यांपर्यंत वाढ होते. रॉयल जेली, प्रोपोलिस आणि मधमाशांचे विष यांसारख्या मूल्यवर्धित उत्पादनांची विक्रीही करता येते. कमी जागा आणि कमी भांडवलात सुरू करता येणारा हा व्यवसाय शेतीला पूरक ठरतो. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मधपेट्या, मधमाशी वसाहत, मधयंत्रे व आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले जाते. व्यवसायासाठी लागणाऱ्या खर्चापैकी ५० टक्के अनुदान शासनाकडून दिले जाते, तर उर्वरित ५० टक्के रक्कम लाभार्थ्याने भरायची असते. योजनेत तालुकास्तरावर एक दिवसीय जनजागृती शिबिरे आयोजित केली जाणार असून प्रत्येक शिबिरात ५० शेतकरी किंवा मधपाळ सहभागी होऊ शकतील. नवोदित मधपाळांसाठी १० दिवसांचे निवासी प्रशिक्षण, तर प्रगतीशील मधपाळ व संस्थांच्या सदस्यांसाठी महाबळेश्वर येथे २० दिवसांचे निवासी प्रशिक्षण दिले जाणार आहे. दोन्ही प्रशिक्षणांदरम्यान राहण्याची व जेवणाची सुविधा मधमाशी पालनामुळे शेती पिकांच्या उत्पादनात ३० ते ४० टक्क्यांपर्यंत वाढ मंडळामार्फत मोफत उपलब्ध करून दिली जाईल. मात्र प्रशिक्षणापूर्वी लाभार्थ्याने स्वतःच्या वाट्याची ५० टक्के रक्कम जमा करणे आवश्यक आहे. याकरिता वैयक्तिक अर्जदार साक्षर, १८ वर्षांपेक्षा अधिक वयाचा असणे आवश्यक आहे. वतःची शेती असल्यास प्राधान्य दिले जाईल आणि १० दिवसांचे प्रशिक्षण अनिवार्य आहे. प्रगतीशील मधपाळासाठी वय २१ वर्षांपेक्षा अधिक, किमान दहावी उत्तीर्ण व किमान एक एकर शेती असणे आवश्यक आहे. संस्था नोंदणीकृत असून किमान एक एकर जमीन व ५०० चौ. फूट प्रशिक्षण इमारत असावी.

योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, शैक्षणिक पात्रतेचा दाखला, ७/१२ व ८-अ उतारा (असल्यास), बैंक पासबुकची छायांकित प्रत, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र तसेच विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा लागणार आहे.

या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जालना यांच्या माध्यमातून केली जात आहे. अधिक माहितीसाठी व अर्ज सादर करण्यासाठी इच्छुकांनी (पान २ वर)

# ग्रामोद्योग भरारी पुरस्कारासाठी नामांकनासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने ''ग्रामोद्योग भरारी पुरस्कार २०२६ साठी नामांकने मागविण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. शासकीय योजनांच्या माध्यमातून विशेष करून ग्रामीण भागात यशस्वी उद्योग उभे करणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने ही पुरस्कार योजना सुरु केली आहे.

यंदा या पुरस्काराचे चौथे वर्ष आहे पुरस्कार योजनेत प्रथम, व्दितीय व तृतीय असे तीन पुरस्कार देण्यात येतात व काही उद्योजकांना उत्तेजनार्थ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. संकल्पनेतुन उद्योगाच्या वृध्दीसाठी व उदयोगाला चालना व गती देण्यासाठी सन २०२३ पासून राज्यस्तरीय ''ग्रामोद्योग भरारी पुरस्कार'' सुरु करून माध्यमातून प्रथम, व्दितीय व तृतीय, उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात येत आहेत.

मंडळामार्फत शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून अर्थसहा-य घेवून यशस्थिपणे उद्योग उभारणी करून रोजगाराच्या नविन संधी उपलब्ध केलेल्या मंडळाच्या यशस्वी उद्योजकांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे व त्यांचा यथोचित सन्मान व्हावा याकरिता महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राज्यस्तरीय ग्रामोद्योग भरारी पुरस्कार २०२६ करिता अर्ज मागवण्यात येत आहेत.नामांकन अर्ज मंडळाच्या .. या संकेतस्थळावर तसेच खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या जिल्हा कार्यालयात उपलब्ध आहेत. इच्छुकांनी आपले नामांकन अर्ज दि.२८ जुलै, २०२६ पूर्वी जिल्हा कार्यालयात पाठवावेत अधिक माहितीसाठी संपर्कः- जिल्हा ग्रामोदयोग अधिकारी, जिल्हा कार्यालय अशी माहिती जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# एसआयआर मोहिमेला वेग; जाफ्राबाद नगर पंचायतेत बीएलओंची आढावा बैठक

**दत्ता देशमुख**

राज्यभर सुरू असलेल्या विशेष सघन पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेच्या पार्श्वभूमीवर जाफ्राबाद नगर पंचायत कार्यालयात मुख्याधिकारी सुरज बिस्किटे यांच्या अध्यक्षतेखाली नगर पंचायत क्षेत्रातील बीएलओ यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.



बैठकीत एसआयआर मोहिमेअंतर्गत सुरू असलेल्या घरभेटी, मतदारांची माहिती संकलन, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा तसेच प्रत्येक पात्र मतदाराची माहिती अचूकपणे नोंदविण्याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

मुख्याधिकारी सुरज बिस्किटे यांनी प्रत्येक बीएलओने आपल्या प्रभागातील काम निर्धारित वेळेत, पारदर्शकपणे आणि जबाबदारीने पूर्ण करावे, अशा सूचना दिल्या. कोणताही पात्र मतदार प्रक्रियेपासून वंचित राहू नये तसेच सर्व नोंदी शासनाच्या नियमांनुसार अचूक ठेवाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी एसआयआर मोहिमेतील अडचणी, त्यावरील उपाययोजना आणि पुढील नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांनी बीएलओंना शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार (पान २ वर)

# टेंभुर्णी गावाची अवस्था, नेते कार्यकर्ते,गावकरी, आपण टेंभुर्णीचे आहोत हे विसरायला लागले - जनार्दन झोरे

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी तालुका जाफराबाद जिल्हा जालना हे गाव जाफराबाद तालुक्यात सर्वात मोठे गाव आहे. या गावचा इतिहास निजाम काळापासून एक ऐतिहासिक गाव म्हणून नाव लौकिक आहे. गावाचा ऐतिहासिक ठेवा असा आहे की या गावांमध्ये बारा मारुती (जुने गाव ), बारा महादेवाची मंदिरे, बारा मारुती आणि बारा महादेवाची मंदिरे एकाच मंदिरात स्थापन आहे. दोन मोठ्या वेळेस आहे. दोन्ही वेशीबाहेर दोन बारवा आहे. अशा या ऐतिहासिक गावामध्ये पूर्वीपासूनच एकोप्याने राहणारी



लोक आहे. पाच पोरांची टेंभुर्णी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टेंभुर्णी चा नावलौकिक आहे. टेंभुर्णी ला ग्रामपंचायत निर्माण झाल्यानंतर येथे ग्रामपंचायतीचा कारभार अतिशय वातावरणात आणि गावाला धरून चालणारा होता. हळूहळू गाव मोठे होत गेले आणि ग्रामपंचायत चा कारभारी मोठा होत गेला. हळूहळू या ग्रामपंचायत मध्ये राजकारण सुरू झाले. असा जसा ग्रामपंचायतला निधी वाढत गेला तसा तसा राजकीय ठेवा ही वाढत गेला. गावातील सामाजिक कार्यकर्ते नेते व राजकीय पक्ष यामध्ये उतरले. हळूहळू गावचा कारभार सुंदर प्रीतीने चालत असतानाच अचानक वेगळ्या पद्धतीने गावचा (पान २ वर)

**सामाजिक कार्यकर्ते जनार्दन झोरे**

युवा नेते व प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते आणि युवकांमध्ये मिसळणारे कार्यकर्ते शेख युसूफ सौदागर यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की मी सतत टेंभुर्णीच्या वरच्या बस स्टैंड वर चक्कर मारत असताना असे दिसते की, टेंभुर्णी गावचा बस स्टँड आहे का फाटा आहे हे समजत नाही. विविध समस्यांनी ग्रस्त अशा या बस स्थानकाला वाली नाही. असतानाच्या शेजारीच पशुसंवर्धनाचा दवाखाना जुना तिथे तर मोकळ्या अवस्थेतील शौचालय झालेले आहे हे दिसते. टेंभुर्णीच्या गेस्ट हाऊस कडून येणारा रस्ता कधी वाकडा झाला हे कळालेच नाही. येणारा रस्ता वाकडा केल्या गेला आणि तिथे अतिक्रमाला चालना मिळाली हे नेमकं कोणी केलं हे कळायला मार्ग नाही. ग्रामपंचायतचे अधिकारी कर्मचारी यांच्याकडून कोणत्या प्रकारची मदत किंवा मार्गदर्शन मिळत नाही. विविध समस्या गावात आहे त्या समस्या सुधारणा झाली नाही तर युवकांमार्फत मोठ आंदोलन उभारण्याची तयारी आहे असेही त्यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

**-युवा नेते शेख युसुफ सौदागर**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.